## सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३.

## मी शपथेवर कथन करते की,

**नाव –** सरीता दशरथ चौगुले.

**वय** - ४५ वर्ष, **व्यवसाय** - शेती व घरकाम,

**राहणार.-** मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

### सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.

**१.** आरोपी क्र.१ माझा दिर असून आरोपी क्र.२ जाऊ आहे. आमची आरोपीं सोबत घराच्या व शेतीच्या कारणांवरुन भांडणे आहेत. दि.२०.१०.२०२२ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता आमचे परडे मोजायला आले असता ते मोजू नये यासाठी आम्ही गेलो होतो. त्यावेळी आरोपी क्र.१ ने माझ्या पतीच्या पायावर, डाव्या हातावर आणि पाठीत लाकडी टोण्याने मारले होते.

२. आरोपींनी मला धक्काबुक्की केली होती. आरोपी क्र.१ ने माझ्या सासूला लाकडी टोण्याने उजव्या हातावरती मारले होते. त्यामुळे आम्ही दवाखान्यात गेलो होतो. तेथे एक्स– रे काढल्यावर फ्रॅक्चर झालेले असल्यामुळे आम्ही देसाई डॉक्टरांकडे गेलो होतो. आरोपी क्र.१ ने माझ्या पतीला व सासूला मारहाण केलेला लाकडी टोणा दाखवल्यास ओळखता येऊ शकतो. आता मला तो टोणा दाखवला, तो तोच असून त्याला वस्तू क्र. अ देण्यात आलेला आहे. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

### उलटतपास – श्री. ए. जी. पाटील वकील.

**३.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनेच्या दिवशी आरोपींच्या स्वयंपाक घरात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीने आरोपी क्र.१ ला चुलीजवळच्या लाकडी काठीने मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या पतीने छायाला धक्काबुक्की केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे पती मारहाण करुन पळून जात असताना उंब–याला धडकून पडल्यामुळे त्यांच्या पाठीला, पायाला व डाव्या हाताला मार लागला होता.

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने माझ्या सासूला लाकडी टोण्याने मारहाण

केल्याचे मी खोटे सांगत आहे. आमच्या व आरोपींच्या जमिनी व घराबाबतच्या केसेस चालू आहेत. आम्ही सध्या राहत असलेले घर माझ्या पतीचे वडिलार्जित घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी राहत असलेले घर त्यांनी एकटयांनी विकत घेतलेले आहे. मला आरोपींनी दोन घरे विकत घेतल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही राहत असलेल्या घराला परडे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगते त्या दिवशी परडे मोजायला सरकारी कर्मचारी आले नव्हते.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती माझ्या सास–यांनी करुन दिलेल्या वाटणीप्रमाणे वहिवाट करत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे आरोपींची व आमची कोणतीही भांडणे झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमच्यावरती केलेल्या खटल्याला शह देण्यासाठी मी खोटी घटना घडल्याचे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दाखवलेल्या वस्तू क्र. अ ने आरोपी क्र.१ ने मारहाण केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र.१ ने केलेल्या मारहाणीमुळे माझ्या पतीचा हात फ्रॅक्चर झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत आम्ही सरकारी व खाजगी दवाखान्यात उपचार घेतल्याचे खोटे सांगत आहे.

६. मी प्रकाश दळवीला ओळखते. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती त्यांच्याकडे टेलरींग काम करत होते. माझे पती प्रकाश दळवीच्या टेलरींग दुकानात काम करत होते. मला आमच्या घराच्या ग्रामपंचायत रेकॉर्ड बाबत माहिती नाही. मला आरोपींनी विकत घेतलेल्या घराचा ग्रामपंचायत क्रमांक माहिती नाही. आम्ही राहत असलेल्या घराचा ग्रा. मि. क्र.९०/२ असून ते माझ्या पतीच्या नावावरती आहे.

७. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी जिऊबाई कसलकर आरोपींच्या घरी होती. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या पतीने तिच्या समक्ष आरोपींना मारहाण केली होती. माझी सासू आमच्या पासून विभक्त राहते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी ती घरी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी ती आरोपींच्या घरी गेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने आरोपी क्र.१ चा वडिलार्जित हिस्सा बळकावण्यासाठी खोटी केस केली आहे. मला शेतक–यांच्या घरात लाकूड व काठी सारखे

हत्यारे असल्याची माहिती आहे. मला दाखवलेल्या वस्तू क्र. अ प्रमाणे शेतक–यांकडे काठया असतात.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – ३०.०६.२०२५.
आजरा.

(आर. पी. थोरे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते